नामसंकीर्तनयोग : खंड १

# नामजप का आणि कोणता करावा ?

मराठी (Marathi)

संकलक

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्‌घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**पू. संदीप गजानन आळशी**

सनातन संस्था

प्रस्तुत पुनर्मुद्रणाच्या ५,००० प्रती आणि या
लघुग्रंथाच्या आतापर्यंत १,९४,७०० प्रती प्रकाशित !

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय

१. अध्यात्माच्या प्रसारासाठी ‘सनातन संस्थे’ची स्थापना !

२. ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाचे जनक !

३. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्‌घोष (वर्ष १९९८)

४. ग्रंथ-निर्मिती : एप्रिल २०२४ पर्यंत ३६५ ग्रंथांच्या १३ भाषांत ९६ लाख ५४ सहस्र प्रती !

५. शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

६. ‘सनातन प्रभात’ नियतकालिकांचे संस्थापक-संपादक !

७. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना दिशादर्शन !

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – ‘www.Sanatan.org’.)**

# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !



स्थूल देह असे स्थलकालाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥

– जयंत बाळाजी आठवले
१८.५.१९९६

---

# पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक ‘सनातन प्रभात’मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

# अनुक्रमणिका

(प्रकरणांतील काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


**प्रकरण १. नामजप, मुद्रा आणि न्यास यांची प्राथमिक माहिती** १०

१ अ. 'नामजप' या शब्दाची व्याख्या १०

१ आ. नामजपाचे महत्त्व १०

१ इ. नामजप करतांना मुद्रा अन् न्यास करण्याचे महत्त्व ११

**प्रकरण २. जिज्ञासूंसाठी उपयुक्त २ नामजप** १३

२ अ. अतृप्त पूर्वजांच्या त्रासांपासून रक्षण होण्यासाठी दत्ताचा नामजप १३

२ आ. आध्यात्मिक उन्नतीसाठी करायचा नामजप १७

**प्रकरण ३. कोणते नामजप करू नयेत ?** ४५

३ अ. गुरूंच्या नावाचा जप ४५

३ आ. संतांच्या नावाचा जप ४७

**प्रकरण ४. नामजपामुळे त्रास किंवा हानी होणे** **५२**
४ अ. नामजपामुळे काही वेळा त्रास होण्याची कारणे ५२
४ आ. नामजपामुळे होऊ शकणारी हानी ५५
卐 **वाईट शक्तींच्या त्रासांचे निवारण करण्यासाठीही नामजप करणे आवश्यक !** **५६**
卐 **‘नामजप कोणता करावा ? (नामजपामुळे होणाऱ्या परिणामांच्या विवेचनासह)’ या ग्रंथातील काही विषय** **५८**
卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** **५९**

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !

१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’ वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले तरी, त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधकांनी लिहून दिलेल्या लिखाणात ‘प.पू.’ किंवा ‘परात्पर गुरु’ अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

# मनोगत

‘सर्वसाधारणपणे मनुष्याच्या जीवनात सुख अल्प आणि दुःख अधिक असते. दुःख सहन करण्याची शक्ती भगवंताच्या नामजपातून मिळते. भगवंत ‘सत्-चित्-आनंद’स्वरूप असल्याने त्याच्या नामाचा जप सतत केल्याने जीवन आनंदीही बनते.

सध्या सर्वत्र काय आढळते, तर देवळातील कुणी पुजाऱ्याने सांगितले, तर लोक नामजप करायला लागतात. एखाद्या पोथीत सांगितलेला नामजप करणारेही असतात. प्रसिद्धीमाध्यमांवर प्रसारित झालेली माहिती वाचून किंवा ऐकूनही काही जण तो नामजप करतात. गुरु किंवा संत यांनी एखादा नामजप करण्यास सांगितले असेल, तर तो करणे सर्वांत योग्य आहे. अन्यथा इतर नामजप करणे, हे स्वतःच्याच मनाने करण्यासारखे आहे. ‘स्वतःच्या मनानेच साधना करणे’, ही अध्यात्मातील मोठी चूक आहे. मग गुरु किंवा संत यांनी सांगितले नसेल, तर कोणता नामजप करणे योग्य आहे ? आपण ज्या कुळात जन्माला

येतो त्या कुळाची कुलदेवी किंवा कुलदेव यांचा नामजप करणे साधनेच्या आरंभीच्या काळात अधिक योग्य आहे.

सध्या बरेच जण श्राद्ध, पक्ष इत्यादी, तसेच साधनाही करत नसल्यामुळे त्यांना अतृप्त पूर्वजांमुळे त्रास होऊ शकतात, उदा. व्यसन लागणे, विवाह न होणे, पती-पत्नीचे न पटणे, गर्भधारणा न होणे, गर्भपात होणे. अतृप्त पूर्वजांच्या त्रासांपासून रक्षण होण्यासाठी 'श्री गुरुदेव दत्त ।' हा नामजप करणे आवश्यक असते.

कुलदेवता आणि दत्त यांच्या नामजपांचे महत्त्व, ते नामजप किती करावेत, ते परिणामकारक होण्यासाठी करायचे अन्य उपाय, नामजप केल्याने येणाऱ्या अनुभूती इत्यादींची सविस्तर माहिती या लघुग्रंथात दिली आहे.

'या लघुग्रंथात दिल्याप्रमाणे नामजप-साधना करून सर्वांनी शीघ्र आध्यात्मिक उन्नती करून घ्यावी', ही श्री गुरुचरणी प्रार्थना !' – **संकलक**